# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेस नोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक ०४/१०/२०२१

**खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध गुटखा व विदेशी सिगारेट याचा विक्रीसाठी साठा करून ठेवलेल्या इसमाविरूद्ध गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली कारवाई ''२,३३,१८०/— रू किमतीचा गुटखा व विदेशी सिगारेट जप्त'**

---

मा.पोलीस आयुक्त श्री. बिपिनकुमार सिंग, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा श्री. सुरेश मेंगडे, मा. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा श्री.विनोद चव्हाण यांनी नवी मुंबई हददीत प्रतिबंधीत गुटखा व नशायुक्त पदार्थ विक्री व साठाकरणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. २७/०९/२०२१ रोजी पोहवा/५७८ संतोष दामोदर गायकवाड यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या बातमीची माहितीनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बासितअली सय्यद, पोउपनि विजय शिंगे, सहा.पोउपनि चौधरी, पोहवा/१३७७ तायडे, पोहवा/१२०२ पिरजादे सर्व नेमणूक—अमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई असे खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हददीमध्ये जाउन विनम्रपान शॉप नं.१, हरी कॉर्नर बिल्डीग, आदई सर्कल, सेक्टर नं. ११, नवीन पनवेल, नवी मुंबई येथे छापा टाकला असता रु.२३,८८०/—किमतीचा गुटखा व विदेशी सिगारेट मिळुन आल्याने आरोपी नामे १.आदित्य कैलासनाथ सविता, वय २२ वर्षे यास ताब्यात घेतले. पोलीसांनी पुढील तपासात यश श्री, प्लॉटनं. ए ४४/३०,३१ रो हाउस, सेक्टर नं. ६, नवीन पनवेल येथे झडती घेवुन रु.२,०९,३००/—किमतीचा गुटखा व विदेशी सिगारेट जप्त केला व आरोपी नामे २. सुनिल कुमार गिरधारीलाल विश्वकर्मा, वय ३१ वर्षे, ३. प्रदयुमन कैलासनाथ सविता, वय ३१ वर्षे यांना ताब्यात घेउन खांदेश्वर पोलीस ठाण्यामध्ये गुरक्र. २१२/२१ भारतीय दंड सहिंता १८६० चे कलम १८८, २७२, २७३,३२८ तसेच अन्न सुरक्षा मानदे अधि. कलम २६, २७ सह सिगारेट आणि इतर तंबाखुजन्य पदार्थ (जाहिरातीस प्रतिबंध आणिवाणिज्य, व्यापारनिर्मीती, पुरवठा,वितरण) अधिनियम, २००३ या कायदयाच्या कलम ७ (३), २०(२) अन्वये गुन्हा दाखल करुन नमुद आरोनींना अटक केलली आहे.

गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडून अंमली पदार्थ व गुटखा विक्री विरोधात विशेष अभियान राबविण्यात येत आहे.